# ग्रामपंचायत कार्यालय, एरंडोली

## ता. मिरज जि.सांगली

---

ई-निविदा.क्र. ०१/२०२०-२१
दि. १३/०५/२०२०

## जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत एरंडोली ता. मिरज जि.सांगली यांचेकडून ग्रा.प.स्तर खालील विकास कामासाठी जि.प सांगली यांच्याकडील नोंदणीकृत **विद्युत ठेकेदार** यांचेकडून खालील कामाची तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक निविदा मागवत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म किंमत | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौ. एरंडोली ता. मिरज येथे स्ट्रीट लाइट बसविणे . | २९९६२६.०० | ३०००.०० | १०००.०० | दोन महिने | वर्ग- ड व त्यावरील |
| 2 | मौ. एरंडोली ता. मिरज येथे ग्रीड सौर यंत्रणा बसविणे . | ३१४९९९.०० | ३२००.०० | १०००.०० | दोन महिने | वर्ग-ड व त्यावरील |

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारेऑनलाईनपद्धतीनेसंगणकीयआज्ञावलीतहोईल.सदरनिविदासंदर्भातील निविदा नोटीस, प्रसिद्धी, सूचना, शुद्धीपत्रके इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धआहे.

२. वरील कामाची निविदापत्रके,अटी व शर्थी उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असून दि. १३/०५/२०२० रोजी सकाळी १२.०० ते दि. २०/०५/२०२० रोजी १७.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अधिग्रहित (Download) व सादर (Upload) करता येतील.

३. निविदेसोबत खालील बाबी सदर करणे आवश्यक आहे. प्रत्येक कामाची निविदा अधिग्रहित करणेसाठी (Download) निविदा सुचनेतील ताक्त्यामधील रकाना क्र.४ आणि ५ मध्ये नमूद रक्कम शासनाच्या ई-पेमेंट गेट वे द्वारे जमा करावयाची असून सदरची पोचपावती तांत्रिक लिफाफा-१ मध्ये स्कॅन करून दिलेल्या ठिकाणी निविदेसोबत ऑनलाईन जोडणेचा आहे.

४. मक्तेदारांनी खालीलप्रमाणे दोन लिफाफा पद्धतीने (Two Envelop) निविदा सदर करणे आवश्यक आहे.

**A. <u>लिफाफा क्र.-१ (तांत्रिक लिफाफा)</u>**

1. टेंडर फी व बयाना रक्कम ऑनलाईन भरणा केलेली पावती निविदेसोबत सादर करावी.
2. जिल्हा परिषद, सांगलीकडे मक्तेदार म्हणून नोंदणी केलेल्याप्रमाणपत्राची प्रत स्कॅन करून सदर करावी.

3. मागील ३ वर्षात पूर्ण केलेली कामे/कामाचे परिणाम/कामाच्या कालावधीबाबत(Work done certificate)संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीने प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत.
4. याच पद्धतीने कामाचे अनुभव असलेबाबत संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीने दिलेले अनुभव प्रमाणपत्राची प्रत स्कॅन करून सादर करावी.
5. मक्तेदाराकडे उपलब्ध असणाऱ्या स्वतःच्या मालकीची किंवा भाडेतत्वावर उपलब्ध होणाऱ्या यंत्राची व साहित्याची माहिती.
6. GST Registration प्रमाणपत्राची तसेच क्लीरन्स प्रमाणपत्र स्कॅन करून जोडण्यातयावे.
7. व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्राची तसेच क्लीरन्स प्रमाणपत्र स्कॅन करून जोडण्यातयावे.
8. मागील तीन वर्षांचे प्राप्तीकर भरलेले प्रमाणपत्र व पॅनकार्ड स्कॅन सादर करावे.
9. आवश्यकता असलेस भागीदारी प्रमाणपत्राची प्रत स्कॅन करून सादर करावे.
10. निविदा सुचनेतील इतर आवश्यक बाबी.

**B लिफाफा क्र.२ (आर्थिक लिफाफा)**

1. मक्तेदारानी आपले दर विहित "BOQ" मध्ये योग्य त्या ठिकाणी भरून सदरची "BOQ" लिफाफा क्र.२ मध्ये अपलोड करावी. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या निविदेचे दर इतर कोठेही नमूद करणेत येऊ नयेत.
2. performance Security Deposit चा डिमांड ड्राफ्ट स्कॅन करून जोडण्यात यावा,व सदरचा डी.डी. निविदा उघडण्यापूर्वी ग्रामपंचायतिकडे जमा करण्यात यावा.
3. मक्तेदाराने कामाचे नकाशे, निविदा मधील अटी व शर्थी बाबनिहाय specifications कामाचे स्थळ, मजूर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबीचा अभ्यास करून निविदा सादर करावी.
4. ऑनलाईन पद्धतीने सदर केलेला लिफाफा क्र १ (तांत्रिक लिफाफा) दि. २२/०५/२०२० रोजी दुपारी ०२.०० वाजता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सरपंच,ग्रामपंचायत कार्यालय एरंडोली ता. मिरजजि.सांगली यांचे कार्यालयात उपस्थित मक्तेदार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात येईल.
5. लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी करून सदरच्या छाननीमध्ये पात्र ठरलेल्या निविदा धारकांचा दराचा लिफाफा क्र.२ उघड्नेचा दिनांक व वेळ संबंधित मक्तेदारास ई-मेल अथवा एसएमएस द्वारे कळविला जाईल.
6. मक्तेदारानी सादर केलेली निविदा व निविदेतील दर, लिफाफा क्र.२ उघडले नंतर ३० दिवसानंतर वैधराहील.
7. निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना,शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती "http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
8. निविदा धारकांचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दराचा असेल तर मक्तेदारानी निविदाधीन कामाच्या किमतीवर १% एवढ्या रकमेचा धनाकर्ष (Demand Draft ) परफोर्मस सीक्यूरिटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्येस्कॅन करून सादर करावा. सदरचा धनाकर्षसरपंच ग्रामपंचायत एरंडोली ता. मिरजजि.सांगली या नावाने व एरंडोली या ठिकाणी देय असलेला असावा व निविदा प्रसिद्धीच्या दिनांकानंतर काढलेला असावा. (उदा.१ ते १०% पर्यंत कमीदर १% रकमेचा धनाकर्षकाढलेला असावा.)

9. निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रकमेचाव वरील बाब क्र.८ प्रमाणे येणाऱ्या रकमेसह एकत्रित धनाकर्ष सरपंच ग्रामपंचायतकार्यालय एरंडोली ता. मिरज जि.सांगली या नावानेएरंडोलीयेथे देय असणारा व निविदा प्रसिद्धीच्या दिनांक नंतरच्या तारखेचा काढलेला धनाकर्ष (Demand Draft)परफोर्मस सीक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र.२ मध्ये विहित ठिकाणी स्कॅन करून सादर(upload) करावा.(उदा.१४%कमी दर -१०%पर्यंत कमी दर करिता -१ टक्का व (१४% -१०%) करिता -४% असे एकूण ५%. सदरचा धनाकर्ष निविदा भरण्याची मुदत संपल्यानंतर ७२ तासाच्या आत ग्रामपंचायतिकडे जमा करण्यात यावा. डी डी जमा न केल्यास निविदा अपात्र समजल्या जातील. डी डी मागणी साठी कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
10. निविदेतील सर्व व कोणतीही अटी वा शर्थी पूर्ण न करणाऱ्या मक्तेदाराच्या निविदा व अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.
11. कोणत्याही अटीवर (Conditional) आधारित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत अथवा स्वीकारल्यामंजूर केल्या जाणार नाहीत.
12. निविदेसंदर्भात शुद्धिपत्रक काढणेची गरज भासल्यास ते http://mahatenders.gov.in यासंकेतस्थळावर उपलब्ध होईल.
13. ई-निविदेच्या अटीव शर्थीमध्ये बदल करणे,प्राप्त निविदा पैकी एक किवा सर्व निविदा कोणतेही कारणन देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
14. संक्षिप्त निविदा सूचना व सविस्तर सूचना, निविदा तंत्राचा भाग राहील.
15. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.
16. निविदेसोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व कागदपात्रांवर डिजिटल सही असणे सर्वमक्तेदारासाठी बंधनकारक आहे. त्याशिवाय निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

दिनांक:- १३/०५/२०२०

**ग्रामसेवक /सरपंच**

**ग्रामपंचायत कार्यालय, एरंडोली**

.

Signature Not Verified

Digitally signed by SHIDAGONDA BABURAO VITEKAR
Date: 2020.05.13 11:48:22 IST
Location: Maharashtra-MH